**रे.दि.मु.क्र.३१/२०२०**
(महेश वि. सुरेश)

**आदेश नि.७३ खाली**
(आदेश पारीत दि.०७/०८/२०२४)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादी व प्रतिवादी क्र.६ ते ८ यांना दि.०५/१०/२००७ रोजी दावा मिळकतीबाबत वादीचे वडील बबन महाडीक प्रतिवादी क्र.१ सुरेश महाडीक व प्रतिवादी क्र.८ प्रकाश महाडीक यांचे दरम्यान झालेले करारपत्र मान्य आहे अगर कसे याबाबत वादीने व प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी न्यायालयास कळवावे या विनंतीन्वये **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १२ नियम २** अन्वये दाखल केलेला आहे.

**प्रतिवादीचे कथन –**

२. दि.१५/१०/२००७ रोजीचे करारपत्र हे बोगस आहे. तो वादी यांना मान्य व कबुल नाही.

३. प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी प्रस्तुत नोटीसला कोणतेही उत्तर सादर केले नाही.

४. **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १२ नियम २** अन्वये उभय पक्षकार हे एकमेकांना अभिलेखावर सादर करण्यात आलेली कागदपत्र मान्य आहे अगर कसे याबाबत कळविण्यासाठी लेखी सुचना काढू शकतात. तर **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १२ नियम २अ** अन्वये जर आदेश १२ नियम २ अन्वये काढण्यात आलेल्या लेखी सुचनेस विरुध्द पक्षकारांनी म्हणणे सादर केले नाही तर ते कागदपत्र त्याला मान्य आहेत असे गृहीत धरावे असे नमुद केले आहे. तसेच न्यायालयास वाटल्यास सदरचे कागदपत्र न्यायालय हे योग्य त्या मार्गाचा अवलंब करुन शाबीत करण्याबाबत आदेश पारीत करू शकतात.

५. प्रस्तुत कामी वादी यांनी प्रतिवादीस जे दि.०५/१०/२००७ रोजीचे करारपत्र मान्य करणे अपेक्षीत आहे ते कागदपत्र बनावट व बोगस असल्याचे म्हणणे वादी यांनी सादर केले आहे. तसेच सदरचे कागदपत्र वादीने मान्य करण्याचे नाकारल्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दि.०५/१०/२००७ रोजीचे करारपत्र भारतीय पुरावा कायद्यामध्ये नमुद तरतुदीनुसार योग्य त्या मार्गाने शाबीत करुन घेणे अपेक्षीत आहे. सबब वर नमुद कारणांचा विचार करून मी **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १२ नियम २अ** अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

**आदेश**

१. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दि.०५/१०/२००७ रोजीचे करारपत्र त्यांना त्यांच्या बचावाप्रित्यर्थ पुरक व आवश्यक वाटत असल्यास सदरचे करारपत्र प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी भारतीय पुरावा कायद्यामध्ये नमुद तरतुदींनुसार सिध्द करावे.

२. सदरचे कागदपत्र सिध्द करण्याचा खर्च देखील प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी सोसावा.

दिनांक ०७/०८/२०२४.

(एम.आर. काळे)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
चिपळूण.